महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ २५ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक - ०९३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत ०२ रुपये

## आत्मनिर्भर भारतासाठी स्वदेशीकडे वळूया

### भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे आवाहन

**भाजपच्या वतीने देशभरात 'आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान' राबवले जाणार आहे. आपणही या अभियानात सामील होऊन आत्मनिर्भर भारताचा संकल्प करूया, फक्त स्वदेशी वस्तूच वापरूया असे आवाहन चव्हाण यांनी यावेळी केले. यावेळी भाजप कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, भाजप महाराष्ट्र प्रदेश अनुसूचित जाती मोर्चा सरचिटणीस शशिकांत कांबळे, मंडल अध्यक्ष मितेश पेणकर, करण जाधव, धनाजी पाटील, प्रिया जोशी , शक्तिवान भोईर, रितेश फडके, पवन पाटील, लक्ष्मण पंत, परेश तेलंगे, विश्वजीत करंजुले, नितेश म्हात्रे, स्वप्निल काटे, समीर भंडारे, नवनाथ पाटील, माजी नगरसेवक मुकुंद पेडणेकर, राजश्री पाजनकर या पदाधिकाऱ्यांसह अनेक भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.**



**"आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान" अंतर्गत राष्ट्रीय, राज्य, जिल्हा आणि मंडल पातळीवर कार्यशाळा, महिला व युवा संमेलन, व्यापारी व उद्योग परिषद, स्वदेशी मेळावे तसेच "आत्मनिर्भर भारत संकल्प रथ" यांसारखे विविध कार्यक्रम देशभर होणार आहेत. शेतकरी, महिला, युवक, कारागीर, छोटे दुकानदार, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक क्षेत्र तसेच व्यापारी व उद्योग क्षेत्र यात सक्रिय सहभाग घेणार असून "घर घर स्वदेशी" या भावनेतून स्वदेशी उत्पादनांचा प्रसार, लघुउद्योगांना प्रोत्साहन आणि स्थानिक उद्योजकांना आधार देणे हा अभियानाचा मुख्य उद्देश असून या उपक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात जनजागृती मोहीम, स्पर्धा, परिसंवाद, स्वदेशी मेळावे तसेच सोशल मीडियावर जनसंपर्क अभियान राबवले जाईल. "मी फक्त स्वदेशी स्वीकारतो" हा संकल्प लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, युवक व महिला यांच्याकडून करण्याचे नियोजन असल्याचे ते म्हणाले. या चळवळीला डिजिटल बळ दिले जाणार असून या अभियानाच्या माध्यमातून देशाची आर्थिक प्रगती, सांस्कृतिक ओळख आणि सामाजिक आत्मनिर्भरता अधिक बळकट करण्याचा संकल्प अआज आम्ही केला आहे ■ रविंद्र चव्हाण, भाजप प्रदेशाध्यक्ष**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आत्मनिर्भर भारताच्या दिशेने आपला देश निरंतर वाटचाल करत आहे. या वाटचालीला गती देण्यासाठी आपल्यापैकी प्रत्येकाचे योगदान आवश्यक आहे. यासाठीच प्रत्येक भारतीयाने स्वदेशी वस्तू वापरण्याचे आवाहन भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले. हे आवाहन प्रत्येकापर्यंत पोहोचवण्यासाठी 'प्रत्येक घरी स्वदेशी, घरोघरी स्वदेशी' या आवाहनानुसार आकाशात झेपावलेला भव्य फुगा डोंबिवलीतील घारडा सर्कल येथील 'नमो रमो नवरात्री'च्या परिसरात लावण्यात आला आहे. यासोबतच याठिकाणी स्वदेशी वस्तू वापरण्याचा संदेश देणारे फलकही लावण्यात आले आहेत. भव्य फुगा आणि फलक बघून प्रत्येकाच्या मनातील फक्त स्वदेशी वस्तू वापरण्याचा संकल्प आणखी दृढ होईल, असा विश्वासही प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी व्यक्त केले. या उपक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात जनजागृती मोहीम, स्पर्धा, परिसंवाद, स्वदेशी मेळावे तसेच सोशल मीडियावर जनसंपर्क अभियान राबवले जाईल. "मी फक्त स्वदेशी स्वीकारतो" हा संकल्प लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, युवक व महिला यांच्याकडून करण्याचे नियोजन असल्याचे ते म्हणाले.

लक्षवेधी

## मेट्रो ७ मार्गिकेच्या सेवेत तात्पुरते बदल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळाने (एमएमएमओसीएल) दहिसर गुंदवली मेट्रो ७ मार्गिकवरील सेवेत काही काळासाठी बदल केले आहेत. या मार्गिकवरील दोन्ही मार्गावरील मेट्रो गाड्या आजपासून गुंदवली आरेदरम्यानच धावणार आहेत. तर मेट्रो ७ मार्गिकवरील दोन्ही मार्गावर ओवरीपाडा - आरेदरम्यान एकेरी वाहतूक सुरू असणार आहे. मेट्रो सेवेतील हे बदल लक्षात घेऊन प्रवाशांना प्रवास करावा लागणार आहे.

मेट्रो २ अ आणि ७ मार्गिकच्या संचलनाशी संबंधित काही कामे एमएमएमओसीएलला करायची आहेत. या कामासाठी बराच कालावधी लागतो. ही कामे सेवा कालावधीत करण्यासाठी एमएमएमओसीएलने मेट्रो ७ मार्गिकच्या सेवेत काही बदल केले आहेत. या मार्गिकवरील दोन्ही मार्गावर काही गाड्या बुधवारपासून गुंदवली आरेदरम्यान धावणार आहेत. तर मेट्रो ७ मार्गिकवरील दोन्ही मार्गावर ओवरीपाडा आरेदरम्यान एकेरी वाहतूक सुरू असणार आहे. हे बदल काही काळासाठीच असणार आहेत, हे बदल तात्पुरते असल्याचेही एमएमएमओसीएलने स्पष्ट केले आहे. मात्र किती काळासाठी हे बदल राहतील हे स्पष्ट केलेले नाही. दरम्यान, दहिसर - अंधेरी पश्चिम मेट्रो २ अ मार्गिकवरील दोन्ही मार्गावरील सेवा सुरळीत सुरू असणार आहे.

## दोनशे मीटर अंतरात दहा गतिरोधक ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ, ता. २४ :** शहरातील कर्जत-काटई राज्यमार्गाच्या रस्त्यावर दोनशे मीटरच्या अंतरात तब्बल दहा गतिरोधक उभारले आहेत. वाहतुकीच्या नियमानुसार आवश्यक असलेले पांढरे पट्टे, थर्मी पेंट किंवा सूचनाफलक येथे कुठेही नसल्याने वाहनचालकांसाठी हे गतिरोधक अपघाताचे सापळे ठरत आहेत.

रॉयल पार्क ते सीएनजी पेट्रोलपंप या वर्दळीच्या रस्त्यावर अवघ्या दोनशे मीटरमध्ये दहा गतिरोधक आल्याने अनेक वाहनांचे नुकसान होत आहे. अपघाताच्या घटनाही वाढल्या आहेत. विशेष म्हणजे, या मार्गालगत म्हाडा कॉलनी, काही वसाहती आणि शाळा असूनही नियमबाह्य पद्धतीने गतिरोधक उभारल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. वाहतूक नियमांनुसार गतिरोधक उभारल्यावर त्यावर पांढरे पट्टे, थर्मी पेंट आणि किमान ४० मीटर आधी सूचनाफलक असणे गरजेचे आहे. तसेच रम्बलिंग पद्धतीचे गतिरोधक असावेत, उंची व लांबीही ठरावीक मयदित असावी, असा नियम आहे; मात्र या रस्त्यावरच्या गतिरोधकांमध्ये कुठलाही नियम पाळलेला नसल्याचे नागरिकांनी सांगितले.

अपघात टाळण्यासाठी गतिरोधक हवेत याबाबत दुमत नाही; पण नियमबाह्य, अनावश्यक गतिरोधक लगेच काढून टाकावेत. आवश्यक त्या ठिकाणीच पांढरे पट्टे व सूचनाफलकांसह नियमांनुसार गतिरोधक उभारावेत, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

## वांगणी-बदलापूर दरम्यान लोकलखाली म्हशी अडकल्या

### रेल्वे वाहतूक ठप्प - कामावर निघालेल्या प्रवाशांचे हाल !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबईकरांची जीवनवाहिनी मानली जाणाऱ्या लोकलबाबत अपडेट समोर आली आहे. लोकल खाली दोन म्हशी अडकल्याची घटना घडली असून यामुळे वाहतूक ठप्प झाली आहे. परिणामी गेल्या तासाभरापासून रेल्वे वाहतूक सेवा खोळंबली असून प्रवाशांचे हाल होत आहे. मिळालेल्या माहिती नुसार, वांगणी-बदलापूर दरम्यान ही घटना घडली. बदलापूर ते कर्जत मार्गावर अप दिशेवर मुंबईकडे जाणारी लोकल वांगणी बदलापूर दरम्यान गोरेगाव येथे खोळंबली आहे. सकाळी अकरा वाजून सात मिनिटांनी ही लोकल वांगणीहून मुंबईच्या दिशेने रवाना झाली होती. मात्र त्याचवेळी काही म्हशी रेल्वे ट्रॅकवरून जात असताना त्यातील दोन म्हशी लोकल खाली सापडल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला. घटनेची माहिती मदत पथकाला मिळताच म्हशी बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले मात्र कामावर निघालेल्या प्रवाशांना लेटमार्क लागला आहे.



## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून मराठवाड्यातील अतिवृष्टीचा आढावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वार्ताहर/दि.24**

**ठाणे :** मराठवाड्यातील अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लक्ष ठेवून असून, मराठवाड्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवरून संवाद साधून त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. पुराच्या पाण्यात अडकून पडलेल्या नागरिकांना तातडीने मदत करून सुरक्षितस्थळी हलविण्याचे निर्देश त्यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले. तसेच उपमुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव व संचालकांशी बोलून त्यांना सूचनाही दिल्या.

**मराठवाड्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवरून संवाद**

**-------------**

**राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाला तातडीने मदत पुरवण्याचे, पुराच्या वेढ्यात अडकलेल्या नागरिकांची त्वरित सुटका करण्याचे निर्देश**

मराठवाड्यात सर्वत्र अतिवृष्टी झाल्याने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. अशा परिस्थितीत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पूर परिस्थितीचा आढावा घेऊन लोकांना तत्काळ मदत पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. यावेळी बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवरून संवाद साधून परिस्थितीचा आढावा घेतला.

दरमान धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यातील ढगपिंपरी गावातील नागरिक पूर परिस्थितीत अडकल्याचे त्यांना समजले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी जिल्ह्याधिकाऱ्यांशी बोलून तत्काळ एनडीआरएफच्या मदतीने हेलिकॉप्टर पाठवून पुराच्या वेढ्यात अडकलेल्या नागरिकांना तातडीने एअरलिफ्ट करून सुरक्षितस्थळी नेण्याचे निर्देश दिले. तसेच कोणतीही मदत लागल्यास तत्काळ आपल्याशी संपर्क साधावा आणि वेळोवेळी पूर परिस्थितीची माहिती आपल्याला द्यावी असेही संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले.

## जिल्हा परिषदा - पंचायत समित्यांच्या अंतिम मतदार याद्यांसाठी एक महिन्याची मुदत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीच्या गट व गणनिहाय अंतिम मतदार याद्या २७ ऑक्टोबरपर्यंत प्रसिद्ध करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील ३२ जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. दिवाळीनंतर मतदार याद्या अंतिम होणार असल्याने प्रत्यक्ष निवडणूक नोव्हेंबर अखेर किंवा डिसेंबरमध्ये होण्याची दाट शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने आयोगाला दिला आहे. तयानुसार निवडणुकीची प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. त्रिस्तरीय निवडणुकीत ३२ जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत येणाऱ्या ३३६ पंचायत समित्यांची निवडणूक पहिल्या टप्प्यात घेतली जाईल. त्यानंतर नगरपालिका व अंतिम टप्प्यात महानगरपालिकेच्या निवडणुका होणार आहेत.

जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या दृष्टीने ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदेच्या गटाची व पंचायत समितीच्या गणांची प्रभाग रचना नुकतीच पूर्ण केली आहे. आता मतदार यादीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने पूर्ण करण्याचा आदेश जिल्हा प्रशासनाला दिला आहे. या निवडणुकांसाठी विधानसभा मतदारसंघाची १ जुलै २०२५ ची मतदार यादी विचारात घेतली जाणार आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या गटांमध्ये व पंचायत समितीच्या गणांमध्ये विधानसभा मतदार संघाची विद्यमान यादी विभाजीत केली जाणार आहे. ८ ऑक्टोबरपर्यंत प्रारुप मतदार यादी तयार करावी. ८ ते १४ ऑक्टोबर दरम्यान मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत. २७ऑक्टोबर रोजी अंतीम मतदार यादी मतदान केंद्रनिहाय प्रसिद्ध करावी, असे आयोगाने जिल्हाधिकारी यांना मंगळवारी पाठवलेल्या पत्रामध्ये म्हटले आहे.









## मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते १०० कंत्राटी शिक्षकांना कायम नेमणुकीचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे / दि. २४**

ठाणे जिल्ह्यातील विशेष गरजा धारक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि वैद्यकीय गरजांची पूर्तता करण्यासाठी समग्र शिक्षा अभियानांतर्गत समावेशित शिक्षण उपक्रम राबविण्यात येतो. या उपक्रमांतर्गत २००४ पासून मानधन तत्वावर कार्यरत असलेल्या विषय शिक्षक व विशेष शिक्षकांना आज एक महत्त्वाचा टप्पा गाठत कायम नेमणुकीचे आदेश वितरित करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाणे जिल्ह्यातील आज, दि. २४ सप्टेंबर, २०२५ रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात एकूण १०० विषय शिक्षकांना "विशेष शिक्षक" या कायमस्वरूपी पदावर नेमणुकीचे आदेश प्रदान करण्यात आले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मा. रोहन घुगे यांनी शिक्षकांचे अभिनंदन करताना सांगितले की, "दिव्यांग व विशेष गरजा धारक विद्यार्थ्यांचे शिक्षण ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. कायमस्वरूपी पदावर नेमणुकीमुळे शिक्षकांचा आत्मविश्वास दुणावेल आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी निश्चित होईल."



## पेण तालुक्यात धक्कादायक प्रकार
# अल्पवयीन मुलीचा बालविवाह



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात अल्पवयीन मुलीचा २२ वर्षीय तरुणासोबत बालविवाह करून दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मुलीचे आई-वडील, सासू-सासरे आणि पती यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पेण तालुक्यातील एका गावात दि. १ मे २०२४ पासून १४ सप्टेंबर २०२५ दरम्यान पीडिता मुलगी राखी (नाव बदललेले) ही वयाच्या १७ वर्ष ५ महिन्यांची असताना तिचे आई-वडील व सासू-सासरे यांनी सामाजिक रीतिरिवाजाप्रमाणे तिचा विवाह २२ वर्षीय तरुणाशी लावून दिला.

सासरी राहात असताना आरोपी पतीने तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले आणि त्यातून ती गर्भवती राहिली. अलीकडेच तिने अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात एका बालकास जन्म दिला आहे.

**पती सासू सासरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल**

याबाबत पेण पोलीस ठाणेत POCSO अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास पोलीस उप निरीक्षक सुनील चव्हाण हे करीत आहेत.

**कायदा असूनही बालविवाह सुरूच**

वयाच्या १८ वर्षांच्या आतील मुलींचे लग्न करणे बालविवाह प्रतिबंध कायद्यानुसार गुन्हा ठरतो. तरीही आदिवासीबहुल वाड्या-वस्त्यांमध्ये अजूनही लपूनछपून बालविवाह होत असल्याचे स्पष्ट होते. या समाजात लहान वयातच मुलगा-मुलगी एकत्र राहण्याचा कल अधिक दिसून येतो, ज्यामुळे असे गुन्हे घडत असल्याचे पोलिसांनी सांगितले.




### चौथा दिवस : चौथी माळ
# आजची देवी : श्री कूष्मांडा



नवरात्र हा भारतातील सर्वात महत्वाचा आणि शुभ सण आहे. जगभरातील हा सण साजरा केला जातो. जो दुर्गा देवीच्या नऊ रूपांना समर्पित आहे. नवरात्री हा शब्द संस्कृत भाषेतून आला आहे. नव' म्हणजे 'नऊ' आणि 'रात्री' म्हणजे 'रात्र'. तर नवरात्री देवीची 9 रूपे कोणती आहेत जाणून घ्या. शरद ऋतूत महत्त्वाचे सण म्हणजे नवरात्रोत्सव, दसरा, कोजागिरी पौर्णिमा, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, पाडवा, भाऊबीज... असे येतात. सुरुवात होते आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून, म्हणजे घटस्थापनेपासून. आदिमाया, आदिशक्तीच्या उपासनेचे नऊ दिवस म्हणजे नवरात्रींचा उत्सव. या उत्सवाची रंगत सर्व उत्सवांपेक्षा वेगळी आहे. घरात, मंदिरात, मंडपात दुर्गामातेची प्रतिष्ठापना करतात. या उत्सवाचा संबंध थेट बळिराजाच्या कष्टाशी आहे, कष्टकरी शेतकऱ्यांच्या साध्याभोळ्या संस्कृतीशी आहे. घटस्थापना म्हणजे बीजपरीक्षण! वावरात जी पिकं घेतली जातात, त्यापासून अन्नधान्य मळतं. त्या काळ्या आईच्या उपकारांची जाणीव ठेवणं, कृषिवलांचे ऋण मान्य करणं, कृतज्ञता मानणं, धन्यवाद देणं म्हणून हे नऊ दिवस! नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये आदिशक्ती दुर्गेच्या नऊ रुपांची पूजा केली जाते. ही नऊ रूपे नवदुर्गा म्हणून ओळखली जातात.

## श्री कूष्मांडा

दुर्गा देवीचे चौथे स्वरुप असलेली कूष्मांडा देवी अष्टभुजा आहे. देवीने बाण, चक्र, गदा, अमृत कलश, कमळ, कमंडलू, सिद्धी आणि निधींची माळ आदी भुजांमध्ये धारण केले आहे. कूष्मांडा देवीचे वाहन सिंह आहे.

**कूष्मांडा देवीचे पूजन**

सकाळी लवकर उठून नित्यकर्म आटोपल्यानंतर दुर्गा देवीच्या कूष्मांडा स्वरुपाच्या पूजनाचा संकल्प करावा. यथाशक्ती, आपापल्या पद्धती, परंपरांनुसार देवीचे पूजन करावे. देवीचे पूजन करताना लाल रंगाची फुले, जास्वंद किंवा गुलाबाचे फूल आवर्जुन वहावे. यानंतर धूप, दीप आणि नैवेद्य दाखवावा. देवीचे पूजन करताना हिरव्या रंगाचे वस्त्र परिधान करणे शुभ मानले जाते. कूष्मांडा देवीला पांढऱ्या रंगाच्या मिठाईचा नैवेद्य दाखवावा. यामध्ये दही, साखर फुटाणा असल्यास उत्तम, असे सांगितले जाते.

कूष्मांडा देवीचे पूजन करताना तसेच पूजनानंतर पुढील मंत्र म्हणावा. शक्य असल्यास यथाशक्ती जप करावा.

- ॐ देवी कूष्माण्डायै नमः॥

- या देवी सर्वभूतेषु माँ कूष्माण्डा रूपेण संस्थिता।

नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः॥

दुर्गा देवीच्या चौथ्या स्वरुपाचे नाव कूष्मांडा आहे. आपल्या स्मित हास्यामुळे ब्रह्मांड उत्पन्न केल्यामुळे या देवीला कूष्मांडा देवी असे म्हटले जाते. या दिवशी साधकाचे मन अनाहत चक्रात स्थिर झालेले असते. या दिवशी अत्यंत पवित्र आणि स्थिर मनाने कूष्मांडा देवीची पूजा, उपासना करावी, असे सांगितले जाते. या देवीचे निवासस्थान सूर्यमंडळात आहे. तिथे निवास करण्याची शक्ती केवळ या देवीमध्येच आहे. कूष्मांडा देवीच्या उपासनेमुळे भक्तांचा आजार बरा होतो. या भक्तीमुळे आयुष्य, यश, शक्ती आणि आरोग्यात वाढ होते. मनुष्य पूर्णपणे देवीला शरण गेला, तर त्याला शांती आणि समृद्धीच्या वाटेवर जाता येते. कूष्मांडा देवीची उपासना मनुष्याला रोगापासून मुक्त करून सुख, समृद्धी आणि प्रगतीकडे घेऊन जाणारी ही देवी आहे, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते.

# रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी औषधांची साठेबाजी केली

### एफडीएच्या कारवाईनंतर टिटवाळ्यातील श्रीकृष्णा रुग्णालयाचे स्पष्टीकरण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : बेकायदेशीरपणे औषधांचा साठा केल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाने टिटवाळा येथील डॉ. चेतन पाटील यांच्या श्री कृष्णा रुग्णालयावर काही दिवसांपूर्वी कारवाई केली होती. मात्र या कारवाई नंतर या रुग्णालयाने याबाबत स्पष्टीकरण दिले असून रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून अत्यावश्यक औषधे रुग्णालयात ठेवली होती. केलेली कारवाई हि चुकीच्या हेतूने तक्रारी करून कारवाई घडवून आणली. रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून अत्यावश्यक औषधे रुग्णालयात ठेवली होती यामागे कोणताही चुकीचा हेतू नव्हता. तसेच मेडिकल स्टोअर्सच्या परवाण्यासाठी प्रक्रिया सुरू केली असल्याची प्रतिक्रिया डॉ. चेतन पाटील, डॉ. अर्चना पाटील आणि डॉ. योगेश कवठे यांनी दिली आहे.

याबाबत माहिती देतांना डॉ. चेतन पाटील यांनी सांगितले कि, २०१७ साली रुग्णालय सुरु केल्यानंतर भागीदारीमध्ये मेडिकल स्टोर सुरु केले होते. यातील भागीदाराने पैशांचा गैरव्यवहार, औषधांचा गैरव्यवहार केल्याने त्यांना रीतसर नोटीस देऊन रुग्णालयातून काढण्यात आले. नवीन परवान्यासाठी अर्ज केला असून, हा परवाना येण्यासाठी वेळ लागत होता. यामध्ये रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी काही अत्यावश्यक औषधे रुग्णालयात ठेवली होती. याविरुद्ध काही लोकांनी खोट्या आणि अनावश्यक तक्रारी करून कारवाई घडवून आणली. याबाबत आम्ही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत असून यामागे संबंधितांची उद्दिष्टे वेगळी असून हे चुकीचे असल्याचे डॉ. चेतन पाटील यांनी सांगितले.

तर मेडिकल स्टोरसाठीची परवाना प्रक्रिया सुरु असून आमचे रुग्णालय हे गावाच्या जवळ असल्याने लहान तसेच वृद्ध रुग्णांची संख्या जास्त असल्याने या रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठीच हि औषधे ठेवली होती. एफडीएची कारवाई आम्ही स्वीकारत असून रुग्णालयाची नाहक बदनामी करण्यासाठी काही लोकं गैरकृत्य करत असल्याचे डॉ. अर्चना पाटील यांनी सांगितले.

# त्र्यंबकेश्वर पत्रकारांवरील हल्ल्याचा भिवंडीतील पत्रकारांनी केला निषेध

### पोलीस, उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले निवेदन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : नाशिक येथील त्र्यंबकेश्वर येथे महाकुंभ मेळा आयोजन संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी पत्रकार योगेश खरे,अभिजित सोनवणे व किरण ताजने यांच्यावर स्वामी समर्थ केंद्राजवळील पार्किंगवर कार्यरत असलेल्या गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी शिवीगाळ करीत बेदम मारहाण केली.

या हल्ल्यात किरण ताजने हे गंभीर जखमी होऊन त्यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी व पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत हल्लेखोरां विरोधात कठोर शासन करण्याची मागणी भिवंडी शहरातील सर्व पत्रकारांनी एकत्र येऊन उपविभागीय अधिकारी व पोलिस उप आयुक्त यांना आज दिलेल्या निवेदनात केली आहे.

भिवंडी महानगर पत्रकार संघ व व्हॉईस ऑफ मीडियाने पत्रकार संघाच्यावतीने हे निवेदन देण्यात आले. यावेळी संजय भोईर, संतोष चव्हाण, शरद भसाळे, एम. अबुबकर, फारुक मेमन, मोनीश गायकवाड, अशोक पाटोळे, अभिजित हिरे, अनिल गजरे, भूपेंद्र आंबवणे, दीपक विश्वकर्मा अदि पत्रकार सहभागी झाले होते. पत्रकार समाजातील सत्य घटनांचा आवाज बनतात. अन्याय, भ्रष्टाचार व सामाजिक प्रश्न प्रकाशात आणण्यासाठी ते अहोरात्र परिश्रम घेतात. अशा पत्रकारांवरील हल्ला ही घटना लोकशाहीला काळिमा फासणारी असल्याचे नमूद करीत,सदर प्रकरणातील सर्व हल्लेखोरांना तातडीने कठोर कारवाई करावी, राज्यातील पत्रकारांच्या सुरक्षेसाठी शासना मार्फत विशेष उपाययोजना करण्यात याव्यात.भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शासनाने ठोस व प्रभावी धोरण आखावे अशा मागण्यांचे निवेदन भिवंडी उपविभागीय अधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार चंद्रकांत राजपूत व भिवंडी पोलिस उपायुक्त शशिकांत बोराटे यांना पत्रकार संघाचावतीने देण्यात आले.

# पाचशे रुपयात सोनाळे ते ओंकारेश्वर यात्रा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : ग्रुप ग्रामपंचायत सोनाळे हद्दीतील ग्रामस्थांसाठी सोनाळे (भिवंडी) ते उज्जैन महाकाल व ओंकारेश्वर दर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

समाजसेवक विशू (भाऊ) म्हात्रे यांच्या नियोजन पुढाकाराने व समाजसेवा भावनेतून या यात्रा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. 25 ते 28 ऑक्टोबर 2025 दरम्यान मध्यप्रदेश स्थित दोन ज्योतिर्लिंग उज्जैन महाकाल आणि ओंकारेश्वर असे दर्शन आयोजन लक्झरी बसद्वारे करण्यात आले आहे.

सदर यात्रेकरीता नाममात्र शुल्क पाचशे रुपये ठेवण्यात आले असून ग्रामस्थांनी यासाठी नावनोंदणी करावी असे आवाहन समाजसेवक विशू (भाऊ) म्हात्रे यांनी केले आहे.

# रायगड जिल्ह्यात स्वच्छता अभियान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : जिल्ह्यात दि. 17 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा' अभियान राबविण्यात येत असून सर्व ग्रामपंचायतींमध्ये या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

या मोहिमेअंतर्गत गुरुवार, दि.25 सप्टेंबर रोजी 'एक दिवस, एक तास, एक सोबत' या उपक्रमांतर्गत सकाळी 8 ते 10 या वेळेत प्रत्येक गावात प्रत्यक्ष श्रमदान करून स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार आहे. या वेळी अस्वच्छता असलेली ठिकाणे, कार्यालये, संस्थात्मक इमारती, पर्यटनस्थळे, धार्मिक व आध्यात्मिक स्थळे, ऐतिहासिक वास्तू, नदीकिनारे, समुद्रकिनारे, प्रमुख रस्ते व उद्याने आदींची स्वच्छता करण्यात येईल.

या अभियानात लोकप्रतिनिधी, स्वच्छता प्रेमी नागरिक, युवक मंडळे, अधिकारी व कर्मचारी, एन.एस.एस. स्वयंसेवक, विविध संस्था प्रतिनिधी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. स्वच्छता करून जमा झालेला कचरा योग्य पद्धतीने विल्हेवाट लावला जाणार आहे. यासोबतच वृक्षारोपण, कोपरा बागांची निर्मिती, सुशोभीकरण तसेच सामुदायिक स्वच्छता शपथ घेणे अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच दि.26 सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी एक तास स्वच्छता प्रबोधन संवाद कार्यक्रम होणार आहे. यामध्ये शिक्षक वर्गाकडून विद्यार्थ्यांना सार्वजनिक स्वच्छता, ओला-सुका कचरा वर्गीकरण, शौचालयाचा नियमित वापर आदींबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

या अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांना रायगड जिल्हा परिषदेच्यावतीने सूचना देण्यात आल्या असल्याची माहिती जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन विभागामार्फत देण्यात आली आहे.

### फसवणूक प्रकरणी अटकेत असलेल्या
# राजेंद्र लोढांच्या पोलीस कोठडीत वाढ



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : फसवणूक प्रकरणी अटकेत असलेल्या राजेंद्र लोढांचा पोलीस कोठडीत मुक्काम वाढला असून राजेंद्र लोढा यांना न्यायालयाने २९ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. राजेंद्र लोढांसह त्यांचा मुलगा साहिल विरोधात बनावटगिरी, गुन्हेगारी कट, विश्वासघातासह अन्य कलमांअंतर्गत गुन्हा दाखल करत १५ सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली होती.

राजेंद्र लोढा यांनी नावाजलेल्या लोढा ग्रुप या बांधकाम कंपनीच्या नावावर स्वतःच्या वैयक्तिक फायद्या करता बेकायदेशीर रित्या कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार केलेला आहे. तसेच अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला दिलेला नाही आणि अनेकांना फसविल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.

या गंभीर आरोपावरून तक्रारदारांनी वेळोवेळी पोलीसात तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने मुंबई पोलिस यांनी राजेंद्र लोढायांच्यावर कायदेशीर कारवाई केली.

# ब्रह्मांड कट्टयावर सदानंद राणेंचा अमृत महोत्सव कार्यक्रमाचा शुभारंभ संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : सारे मिळून सर्वांसाठी जिव्हाळ्याचे नाते जपणारे मुक्त व्यासपीठ ब्रह्मांड कट्टा सामाजिक-सांस्कृतिक चळवळ आयोजीत ब्रह्मांड कट्टयावर दिनांक २१ सप्टेंबर २०२५ रोजी जल्लोष ग्रुप प्रस्तुत 'नित्यानंद ते सदानंद' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

लोकनृत्य अभ्यासक दिग्दर्शक गुरू सदानंद राणे यांच्या अमृत महोत्सव निमित्त त्यांचे शिष्य पंकज पाडाळे यांच्या जल्लोष ग्रुप तर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गुरु सदानंद राणे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त वर्षभरात ७५ कार्यक्रम सादर करून गुरूदक्षिणा देण्याचा मानस असल्याचे पंकज पाडाळे यांनी सांगितले. शुभारंभानिमित्त पहिला कार्यक्रम आयोजित करण्याचा मान ब्रह्मांड कट्ट्याला मिळाला.

कार्यक्रमाची सुरवात प्रचिता हिच्या सुरेल आवाजातील गणेश वंदनेने झाली. लोकसंगीत व लोकनृत्य यांचा सुंदर मिलाफ या कार्यक्रमात अनुभवायला मिळाला. महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेतील ठेवा नात्यातून व





गाण्यातून अत्यंत रंगतदार सादरीकरणातून प्रेक्षकांच्या मनात ठसा उमवटाणारा हा कार्यक्रम प्रस्तुत झाला.

जल्लोष ग्रुप प्रस्तुत नृत्यानंद सदानंद या कार्यक्रमात महाराष्ट्र तसेच भारतातील विविध राज्यांतील गाजलेली लोकनृत्य सादर करण्यात आली. यात जोगवा, मंगळागौर, आदिवासी लोकनृत्य, भारूड, लावणी, कोळीनृत्य, बॉलीवुड डान्स, गोवन,साऊथ बंगाली,आसामी नृत्य सादर करण्यात आली. कथ्थक अलंकार गुरू प्रिती घाणेकर, लावणी सम्राट निखील मुंबईकर, नृत्यांगना तृप्ती पाटील, मैत्रिण ग्रुपच्या लाघवी नृत्यांगना स्नेहा,रागिणी,अंजली,अमिता,श्रावणी आणि जल्लोष संस्थेचे आयोजक नृत्यसम्राट पंकज पाडाळे आणि सोबत ४० नृत्य कलाकारांचा संच यांनी हा सुंदर कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले.

शाळेतील शिक्षिका ग्रुप ने सादर केलेले आसामी नृत्य बहारदार होते. लावणी सम्राट निखील मुंबईकर यांनी सादर केलेल्या अप्रतिम लावणी नृत्याने जल्लोषपूर्ण वातावरणात प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली.

या कार्यक्रमास आमदार माननीय श्री.संजय केळकर साहेब उपस्थित होते. या वैविध्यपूर्ण कार्यक्रमाचा त्यांनी आस्वाद घेत कलाकारांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. तसेच माननीय श्री.संजय केळकर साहेबांच्या हस्ते कार्यक्रमाचे उत्सवमूर्ती गुरू सदानंद गुरू यांना ब्रह्मांड कट्ट्यातर्फे मानपत्र व शाल श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. तसेच आयोजक नृत्यसम्राट पंकज पाडाळे यांना सन्मानित करण्यात आले. ब्रह्मांड कट्ट्याचे सल्लागार चित्रकार, लेखक व व्याख्याते श्री.विजयराज बोधनकर यांची अखिल भारतीय साहित्य मंडळाच्या नियामक मंडळावर निवड झाल्याबद्दल ब्रह्मांड कट्टा परिवारातर्फे अभिनंदन करून माननीय आमदार श्री. संजय केळकर साहेब यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. आमदार केळकर यांनी ब्रह्मांड कट्ट्यावर हा दुग्धशर्करा योग आला आहे व तो मला साधता आला त्याबद्दल समाधान व्यस्त केले. सदानंद राणे सरांनी विध्यार्थी व प्रेक्षकांचे आभार व्यक्त केले. लोककलेला प्रोत्साहन देणारा व सांस्कृतिक वारसा जपणारा हा गुरूदक्षिणेचा अनोखा कार्यक्रम ब्रह्मांड कट्ट्यावर सादर झाला. या कार्यक्रमाच्या निवेदिका होत्या उत्कृष्ट निवेदका डॉ. प्रतिक्षा बोर्डे त्यांच्या निवेदनाने कार्यक्रम रंगतदार झाला. या कार्यक्रमाचे ध्वनी व प्रकाश योजना अनंत नाकती यांची होती.

ब्रह्मांड कट्ट्यातर्फे सर्व कलाकारांना संस्थापक राजेश जाधव व अध्यक्ष महेश जोशी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. संगीताचा ठसा आणि महाराष्ट्राच्या भूमीतील लोककलेची जादू यांचा संगम असणारा हा कार्यक्रम अविस्मरणीय होता.






**मेष**
अशी एखादी व्यक्ती भेटेल जिच्याकडून तुम्हाला काहीतरी शिकायला मिळेल. ऑफिसच्या काही कामांमुळे अचानक प्रवास करावा लागू शकतो.

**वृषभ**
एकत्रितपणे केलेल्या कामात तुम्हाला मोठ्या प्रमाणात यश मिळेल.वडिलांचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहतील. उर्जेने खूप काही साध्य कराल.

**मिथुन**
कोणाशीही विनाकारण वाद घालू नका. यामुळे संबंध बिघडेल आणि तुमचे कामही विस्कळीत होईल. तुम्ही काही महत्त्वाच्या बाबींवर निर्णय घेऊ शकता.

**कर्क**
कोणताही निर्णय घेण्यात आराम वाटेल.आपल्या कुटुंबासाठी थोडा वेळ काढल्याने नात्यात गोडवा येईल. कामाचे परिणाम अनुकूल असतील.

**सिंह**
कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत संयम राखाल आणि तुमच्या परिस्थितीत लवकरच सुधारणा होताना दिसेल. तुमच्या यशाचा मार्ग सापडेल.

**कन्या**
फक्त तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. आज एखाद्या खास व्यक्तीच्या मदतीने तुमची प्रलंबित कामे पूर्ण होतील.काम पूर्ण गांभीर्याने होईल.

**तूळ**
तुम्हाला धार्मिक आणि सामाजिक कार्यात रुची असू शकते. कोणतीही योजना कृतीत आणली तर कोणतेही ध्येय साध्य होईल आणि मन प्रसन्न राहील.

**वृश्चिक**
घरात सुख-शांतीचे वातावरण राहील.दिवस तुमच्यासाठी सुवर्ण दिवस असणार आहे. घरात निवांत आणि शांततापूर्ण वातावरण असेल.

**धनु**
तुम्ही काही महत्त्वाचे निर्णय घेऊ शकता जे तुमची आर्थिक स्थिती आणि घरातील व्यवस्था राखण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

**मकर**
घरातील वरिष्ठांचेही सहकार्य मिळेल. कामाच्या ठिकाणी वास्तुचे नियम पाळल्यास सकारात्मक परिणाम मिळतील.आरोग्य निरोगी राहील.

**कुंभ**
धार्मिक कार्यात तुमची आवड वाढेल. कामात व्यस्त राहा आणि अनावश्यक कामात रस घेऊ नका. आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल आहे.

**मीन**
तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. तुम्हाला कामात जास्त मेहनत करावी लागेल, कामाची कार्यक्षमता कमी होऊ देऊ नका. व्यक्तिमत्व सुधारेल.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# अडीच एकर जागा ; तरीही योजना रखडली !

## कासा उपजिल्हा रुग्णालयात जागेचा अभाव



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कासा, ता. २४ (बातमीदार) :** कासा येथील उपजिल्हा रुग्णालयात सध्या मोठ्या प्रमाणात रुग्णसंख्या वाढल्याने जागेची कमतरता तीव्र जाणवत आहे. हे रुग्णालय नाशिक-डहाणू राज्य मार्गावर रस्त्यालगत असल्यामुळे येथे महामार्गावरील अपघातग्रस्त रुग्ण मोठ्या संख्येने उपचारासाठी येतात. याशिवाय आसपासच्या सात प्राथमिक आरोग्य केंद्रांतून पुढील उपचारासाठी रुग्णांना या रुग्णालयात पाठवले जाते.

१९६३मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणून सुरू झालेले हे रुग्णालय १९७८ मध्ये ग्रामीण रुग्णालयात रूपांतरित झाले. पुढे महामार्गावरील अपघात आणि आदिवासी भागातील रुग्णसंख्येची वाढ लक्षात घेऊन याला ५० खाटांचे रुग्णालय करण्यात आले. दरम्यान, दिवसेंदिवस रुग्णसंख्या वाढत असल्याने १०० खाटांच्या श्रेणीवर्धनाची मागणी होत आहे. कासा परिसर दुर्गम भाग असल्याने विंचू व सर्पदंशाचे रुग्ण, प्रसूतीसाठी येणाऱ्या महिला तसेच आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थी नेहमीच या रुग्णालयाचा आधार घेतात. परिणामी रुग्णालयातील ५० खाटांची क्षमता अपुरी पडत असून, रुग्णांवर दाटीवाटीत उपचार करावे लागत आहेत. या विस्तारासाठी अडीच एकर जागेची गरज असून, जागा उपलब्ध न झाल्याने योजना रखडली आहे. खासदार डॉ. हेमंत सावरा यांनी भेटीदरम्यान जागा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले होते. काही वर्षांपूर्वी मोठ्या खचनि आधुनिक ऑपरेशन थिएटर, पुरुष-स्त्री वॉर्ड, स्वतंत्र प्रसूतिगृह व ऑक्सिजन प्लांटची उभारणी करण्यात आली.

मात्र योग्य नियोजनाअभावी या सुविधा अद्याप पूर्ण क्षमतेने वापरात आणल्या गेल्या नाहीत. ऑपरेशन थिएटर धूळ खात पडलेले असून, कोंदट जागेत रुग्णांना उपचार घ्यावे लागत आहेत.

# सर्पदंशावरील अंधश्रद्धेविरोधात मुरबाडमध्ये जनजागृती रॅली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड / दि. २३ :** वाइल्ड इंडिया ०५ फाऊंडेशन आणि न्यू इंग्लिश स्कूल मुरबाड जूनियर कॉलेज यांच्या विद्यार्थ्यांच्या संयुक्त विद्यमाने आज मुरबाड शहरात सर्पदंशावर होणाऱ्या अंधश्रद्धाळू उपचारांविरोधात जनजागृती रॅली काढण्यात आली. ही रॅली मुरबाड बस स्थानकातून सुरू होऊन मुरबाड पोलिस स्टेशनपर्यंत उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी फलक, घोषणाबाजी आणि माहितीपत्रकांच्या माध्यमातून लोकांना सर्पदंश झाल्यास गावठी औषधांचा वापर न करता तातडीने जवळच्या दवाखान्यात जाण्याचे आवाहन केले. रॅलीच्या शेवटी पोलिस ठाण्यात एक लेखी तक्रार अर्ज सादर करून सर्पदंशावरील गावठी औषधी उपचारांवर बंदी आणावी, अशी मागणी आयोजकांकडून करण्यात आली. ही जनजागृती मोहीम सकाळी ११ वाजता पार पडली. आयोजकांनी सांगितले की, अशा उपक्रमांमुळे जीवघेण्या अंधश्रद्धांना आळा बसून लोक वैज्ञानिक व वैद्यकीय उपचारांकडे वळतील.

# जलजीवन मिशन योजनेत रायगड जिल्हा अग्रेसर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अलिबाग, ता. २४ :** नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे तसेच गावातील महिलांचा त्रास कमी व्हावा, यासाठी केंद्र सरकारमार्फत जलजीवन मिशन योजना राबविण्यात येत आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात जलजीवन मिशनची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, रायगड जिल्ह्यातील पाच लाख ४८ हजार ६२० कुटुंबांपैकी चार लाख ९८ हजार ६२८ कुटुंबांना नळजोडणी देण्यात आली आहे. १५ तालुक्यांपैकी विशेष म्हणजे खालापूर, म्हसळा आणि उरण या तीन तालुक्यांत १०० टक्के नळजोडणी झाली आहे. केंद्र सरकारकडून जलजीवन योजना राबविण्यात येत आहे. याअंतर्गत प्रत्येक घरात नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे. या योजनेच्या अंतर्गत जिल्ह्यात ज्या घरामध्ये नळजोडणी आहे त्या घरांची माहिती संकलित करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात ज्या घरांमध्ये वैयक्तिक नळजोडणी नाही अशा घरांना नळजोडणी देण्यात आली. आतापर्यंत जिल्ह्यात ९१ टक्के कुटुंबीयांना नळजोडणी देण्यात आली आहे.

जिल्ह्यात जलजीवन योजना यशस्वी कारण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुधीर वेंगुर्लेकर यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य नियोजन करून योजना प्रभावीपणे राबविली जात आहे. योजनेमध्ये प्रतिदिन प्रतिमाणशी ५५ लिटर याप्रमाणे पाण्याची उपलब्धता अपेक्षित आहे.

# रिक्षा, टॅक्सीचालकांसाठी योजना राबाविण्यासाठी धर्मवीर आनंद दिघे मंडळाचे मुख्यालय सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे शहर, ता. २४ :** महाराष्ट्रातील रिक्षा व टॅक्सीचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यांच्या कल्याणाकरिता ठाण्यात धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटो रिक्षा व मीटर टॅक्सीचालक कल्याणकारी मंडळाचे मुख्य कार्यालय सुरू करण्यात आले आहे. ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे ते सुरु करण्यात आले असून, राज्यातील लाखो रिक्षा, टॅक्सीचालकांच्या जीवनात स्थैर्य आणि सुरक्षिततेचा मार्ग मोकळा झाला आहे. रिक्षा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक हे स्वतः ठाण्यातील असून, या कार्यालयाच्या कामाला गती येईल, असा विश्वास रिक्षा, टॅक्सीचालकांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासोबत झालेल्या बैठकीत रिक्षा, टॅक्सीचालकांच्या कल्याणसाठी सुरू करण्यात आलेल्या मंडळाचे राज्यातील मुख्य कार्यालय ठाण्यात सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कार्यालयामधून रिक्षा व टॅक्सीचालकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याचे कामकाज चालणार आहे. येथून सर्व रिक्षा, टॅक्सीचालकांना घरबसल्या ऑनलाइन सभासद नोंदणी करता येणार आहे.

https://ananddighe kalyankari mandal.org या अधिकृत संकेतस्थळावर वाहन व परवाना क्रमांक, कुटुंबाची माहिती भरून आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्यात यावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन विभागाकडून करण्यात आले आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे कार्य सुरु असून, या चालकांना अधिकृत वेबसाईटवर बनावट लिंकपासून दूर राहण्याची सूचना उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी केली आहे.

# नागरी विरोधामुळे मीरा भाईदर मनपाचे बायोगॅस प्रकल्प रखडले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** डास, दुर्गंधी आणि इतर समस्यांची भीती असल्यामुळे नागरिक बायोगॅस प्रकल्प उभारणीस विरोध करत आहेत. परिणामी, मागील चार वर्षांत आठ पैकी केवळ चार प्रकल्प महापालिकेला सुरु करता आले असल्याचे समोर आले आहे. मिरा-भाईंदर शहरातून दररोज सुमारे ५५० टन कचरा निर्माण होतो. यापैकी सुमारे २०० टन ओला कचरा असतो. या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी शहरात आठ ठिकाणी बायोमेथेनायझेशन प्रकल्प उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला होता. या प्रकल्पांद्वारे ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून नैसर्गिक वायू तयार केला जातो. या प्रकल्पांसाठी एकूण ४५ कोटी ६८ लाख ३० हजार रुपये खर्च अपेक्षित होता. यामध्ये केंद्र व राज्य शासनाकडून महापालिकेला १६ कोटी ७७ लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले असून उर्वरित खर्च महापालिकेच्या निधीतून केला जात आहे. मात्र, मागील चार वर्षांत प्रशासनाला केवळ चार प्रकल्प उभारण्यात यश आले आहे. उर्वरित चार ठिकाणी नागरी विरोधामुळे काम सुरु करण्यात अडचणी येत आहेत. या संदर्भात नागरिकांकडून सातत्याने तक्रारी करण्यात येत आहेत. तसेच आगामी महापालिका निवडणुका लक्षात घेता हे प्रकरण पेटण्याची शक्यता असल्यामुळे प्रशासन देखील ठोस भूमिका घेण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसून येते.

**मिरा-भाईंदर शहरात आठ ठिकाणी बायोगॅस प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार नवघर येथील आरक्षण क्र. १२२ येथे दोन प्रकल्प, कनकिया येथील आरक्षण क्र. २७१ येथे एक प्रकल्प आणि भाईंदर पश्चिम येथील आरक्षण क्र. १३९ येथे एक असे एकूण चार प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. तर महाजनवाडी आरक्षण क्रमांक ३६८, पेणकरपाडा आरक्षण क्रमांक ३५३ आणि तन्वी एमीनेन्ट्स परिसर आणि उत्तन घन कचरा प्रकल्प स्थळी नागरी विरोधामुळे प्रकल्प उभारणीचे काम रखडले असल्याची माहिती पालिकेचे शहर अभियंता दीपक खांबित यांनी दिली आहे.**

# मुंबई बाजार समिती संचालक मंडळाची निवडणूक तातडीने घ्या उच्च न्यायालयाचे निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) संचालक मंडळाची मुदत ३१ ऑगस्ट रोजी संपल्यानंतर शासनाने पणन संचालक विकास रसाळ यांची तात्पुरत्या प्रशासक म्हणून नियुक्ती केली होती. मात्र, निवडणुका न घेता संचालक मंडळ बरखास्त केल्याच्या निर्णयाविरोधात उपसभापतींसह काही संचालकांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर मंगळवारी (२३ सप्टेंबर) न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे व न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार, मुंबई एपीएमसी संचालक मंडळाची निवडणूक तातडीने घेण्यात यावी. असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच विद्यमान प्रशासकाने ताबडतोब पूर्वीच्या निवडून आलेल्या संचालक मंडळाला पदभार द्यावा. असे खंडपीठाने सांगितले आहे. मात्र, नव्या निवडणुका होईपर्यंत हे मंडळ कोणतेही धोरणात्मक निर्णय घेऊ शकणार नाही, अशी सक्त ताकीदही न्यायालयाकडून देण्यात आली आहे. आता निवडणुकीची जबाबदारी ठाणे जिल्हा उपनिबंधकांवर असणार आहे.

# राज्यातील जाहिरात फलकांवर निर्बंध सर्व होर्डिंग्सना फक्त ४० फुटांची मर्यादा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबईसह राज्यात जाहिरात फलकांवर अनेक निर्बंध येणार असून जास्तीत जास्त ४० फूट बाय ४० फूट आकाराचाच जाहिरात फलक लावता येणार आहे. आता प्रचंड आकाराचे जाहिरातफलक लावण्यास मनाई करण्यात आली असून मर्यादेपेक्षा अधिक आकाराचे जाहिरातफलक हटविण्यात येणार आहेत.

इमारतींची गच्ची, आवाराची भिंत यावर जाहिरातफलक लावण्यास मनाई करण्यात आली आहे. याबाबत सर्व महापालिका, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यासह विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांनी एक महिन्यांत कार्यवाही करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. घाटकोपर येथील जाहिरातफलक दुर्घटनेनंतर राज्य सरकारने नियुक्त केलेल्या माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल आणि कृती अहवाल राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी स्वीकारला आहे.

घाटकोपर येथे १३ मे २०२४ रोजी वारा व मुसळधार पावसामुळे प्रचंड आकाराचा जाहिरात फलक पेट्रोल पंपावर कोसळला होता. या दुर्घटनेत १७ नागरिकांचा मृत्यू आणि ८० हून अधिक नागरिक जखमी झाले होते. या दुर्घटनेच्या चौकशीसाठी राज्य शासनाने माजी न्यायमूर्ती भोसले यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती. या समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपला अहवाल सादर केला होता. न्या. भोसले यांच्या अहवालातील निष्कर्ष व समितीने सुचविलेल्या उपाययोजनांवर पडताळणी करण्यासाठी गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने मंत्रिमंडळासमोर विविध विभागांनी करावयाच्या अंमलबजावणीचा कृती अहवाल मंगळवारी सादर केला.

# शहर विद्रुपीकरण करणाऱ्या बॅनर्स आणि फलकांवर केडीएमसीची कारवाई !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

(वार्ताहर/दि.24)

**कल्याण :** महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी दिलेल्या सक्त निर्देशानुसार महापालिकेच्या सर्वच प्रभागांत शहर विद्रुपीकरण करणारे एकुण 890 बॅनर्स, पोस्टर्स व झेंडे काढण्याची कारवाई काल दिवसभरात करण्यात आली.

- 1/अ प्रभागामध्ये 38 बॅनर्स, 8 पोस्टर्स व 10 झेंडे काढण्यात आले.
- 2/ब प्रभागामध्ये 120 बॅनर्स व पोस्टर्स काढण्यात आले.
- 3/क प्रभागामध्ये 52 बॅनर्स व पोस्टर्स काढण्यात आले.
- 4/जे प्रभागामध्ये 15 बॅनर्स, 14 पोस्टर्स व 20 झेंडे काढण्यात आले.
- 5/ड प्रभागामध्ये 82 बॅनर्स व 3 झेंडे काढण्यात आले.
- 6/फ प्रभागामध्ये 30 बॅनर्स, 33 पोस्टर्स व 30 झेंडे काढण्यात आले.
- 7/ह प्रभागामध्ये 105 बॅनर्स काढण्यात आले.
- 8/ग प्रभागामध्ये 50 बॅनर्स, 20 पोस्टर्स व 40 झेंडे काढण्यात आले.
- 9/आय प्रभागामध्ये 80 बॅनर्स व पोस्टर्स काढण्यात आले.
- 10/ई प्रभागामध्ये 140 बॅनर्स काढण्यात आले.

दरम्यान, ही कारवाई यापुढेही नियमित स्वरूपात सुरू राहणार असून अनधिकृत रित्या लावण्यात आलेले सर्व पोस्टर्स, होर्डिंग, बॅनर्स संबंधितांनी स्वतःहून काढून घ्यावेत आणि आपले शहर स्वच्छ, सुंदर आणि विद्रुपतेच्या विळख्याबाहेर ठेवण्यासाठी महापालिकेत सहकार्य करावे असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे

# जिल्ह्यातील हजारो फार्मासिस्टांना न्यायाची प्रतीक्षा

## फ्रंटलाइन वॉरिअरची मान्यता न मिळाल्याने संतापाची भावना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** औषधोपचार ही आरोग्य व्यवस्थेची कणा असली तरी त्या कण्याला आधार देणाऱ्या फार्मासिस्टांचा प्रश्न मात्र कायम दुर्लक्षित आहे. जागतिक फार्मासिस्ट दिन (२५ सप्टेंबर) साजरा होत असताना महाराष्ट्रातील हजारो फार्मासिस्ट पगार, सेवा अटी, नोकरीची सुरक्षितता आणि व्यावसायिक मान्यता या मागण्यांसाठी झगडत आहेत.

राज्यात सध्या ४.८ लाख परवाना प्राप्त फार्मासिस्ट असून जवळपास १.२० लाख औषधांची दुकाने आहेत. याशिवाय मोठ्या प्रमाणात फार्मासिस्ट थेट सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत काम करतात. राज्यात एकूण १००० फार्मासी महाविद्यालये आहेत. एवढा मोठा पसारा तसेच औषध वाटपाची जबाबदारी असलेल्या फार्मस्टिस्ट आजही आपल्या भविष्याविषयी चाचपडत आहेत. करोना काळात आरोग्य विभागाच्या रुग्णालयांत दिवस-रात्र सेवा देऊनही फार्मासिस्टांना फ्रंटलाइन वॉरिअर म्हणून मान्यता न मिळाल्याने त्यांच्यातील संतापाची भावना आजही दिसत आहे.

औषध वाटप, रुग्णांना योग्य मार्गदर्शन, दुष्परिणामांबाबत सतर्कता आणि गुणवत्तायुक्त औषधे उपलब्ध करून देणे ही त्यांची जबाबदारी असली तरी, प्रत्यक्षात त्यांना केवळ "औषध वाटप करणारे" कर्मचारी म्हणूनच ओळखले जातात. सार्वजनिक आरोग्य यंत्रणेत कार्यरत असलेल्या अनेक फार्मासिस्टांना कंत्राटी पद्धतीने नोकरी देण्यात येते.

पदोन्नतीची संधी, निश्चित वेतनमान आणि निवृत्तीवेतनाच्या सुविधांचा अभाव असल्यामुळे हा वर्ग नाराज आहे. औषधसाठा वेळेवर न मिळाल्यास सर्वाधिक रोष हा औषध वितरण काउंटरवर कार्यरत फार्मासिस्टांवरच ओढवतो. ग्रामीण भागात तर "औषध नाही" हा शब्द उच्चारताच त्यांच्यावरच सारा राग काढला जातो.

**" सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत खरतर फार्मासिस्टची भूमिका अत्यंत महत्वाची असणे अपेक्षित आहे. मात्र पदवीधर फार्मासिस्टांना आरोग्य व्यवस्थेत समुपदेशन, उपचार मार्गदर्शन किंवा औषध गुणवत्ता नियंत्रण यामध्ये थेट भूमिका मिळत नाही. बाहेरील अनेक देशात फार्मसिस्टचे महत्व मोठे आहे. तेथे ही मंडळी रक्तदाब तसेच शुगर तपासतात, असे प्राचार्य मंजिरी घरत यांनी सांगितले. खरतर आपल्याकडे प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये फर्मासिस्ट हा कणा असला पाहिजे, पण त्याबाबत कोणतीही ठोस भूमिका आरोग्य व्यवस्थेतील उच्चपदस्थ घेताना दिसत नाहीत. राज्यातील सर्व औषधविक्री दुकानांमध्ये फार्मेसिस्ट नेमणे आवश्यक असल्याचेही प्राचार्य मंजिरी घरत यांनी सांगितले.**



स्वच्छ भारत अभियान अंतर्गत

# अंबरनाथ नगरपरिषद व ITI कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने 'स्वच्छता ही सेवा मोहीम'



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** मा. मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांचे मार्गदर्शनाने आज दि. 24 रोजी अंबरनाथ नगरपरिषद व ITI कॉलेज यांच्या संयुक्त विद्यामानाने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता ही सेवा मोहीम राबविण्यात आली असताना गोविंद पुल ते स्मशानभूमी (पूर्व) रस्ताची साफसफाई करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार स्वच्छ भारत हरित भारत हरित प्रतिज्ञा घेण्यात आली त्यातून शहर स्वच्छ ठेवण्याचा व पर्यावरण संरक्षण चा संदेश देण्यात आला. यावेळी आरोग्य खातेप्रमुख राजेश शिंदे, उपखातेप्रमुख संदिप खोजे, स्वच्छता निरीक्षक महेश जाधव व जयंत कल्याणकर आणि १०० ते १५० विद्यार्थांसह प्राचार्य व प्राध्यापक वर्ग आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# जीवनदीपच्या विद्यार्थीनीला मुंबई विद्यापीठ मेंहदी स्पर्धेत बक्षीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई / दि. 24**


क्रीडा क्षेत्राबरोबरच कला क्षेत्रात देखील जीवनदीपचे विद्यार्थी गगन भरारी घेताना दिसत आहेत. दिनांक २३- ०९-२०२५ रोजी ५८ व्या युवक महोत्सवाची मेहंदी डिजाइन स्पर्धा ही मुंबई विद्यापीठात पार पडली.

या स्पर्धेत जीवनदीप महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्रणाली शेलार (तृतीय वर्ष आय टी) हिने या स्पर्धेत उत्कृष्ट मेंहदी काढून बक्षीस मिळवलं आहे. तिच्या या कामगिरीचे कौतुक संस्थेचे



अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे ,संचालक. प्रशांत घोडविंदे ,यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. अशोक वाघ ,उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, सांस्कृतिक विभागप्रमुख. प्रा. सतीश लकडे, तसेच प्रा. मयुरी कांबळे, प्रा. मोहन गारे, यांनी सदर विद्यार्थिनीचा महाविद्यालयात ज्ञानाचे प्रतीक समजले जाणारे पुस्तक देत सन्मान केला.

व तिच्या पाठीवर शाब्बासकीची थाप देत अशाच प्रकारची कामगिरी या पुढे देखील करावी याकरता शुभेच्छा दिल्या. प्रणालीच्या या कृतीमुळे महाविद्यालय, मित्रपरिवार, नातेवाईक यांच्याकडून प्रणालीवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# गुणवंतांचा गुणगौरव व जेष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभाचे आयोजन!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता /शहापूर ग्रामीण :** शहापूर तालुका आगरी समाज संचलित सामाजिक व शैक्षणिक संस्था, गंगा देवस्थान, वाफे-शहापूर यांच्या वतीने तालुक्यातील गुणवंतांचा गुणगौरव व जेष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार 28 सप्टेंबर रोजी आगरी समाज हॉल, गंगा देवस्थान, वाफे-शहापूर येथे सन 2024-025 मध्ये दहावी, बारावी पदवीधर, इंजिनिअर व डॉक्टर पदवी प्राप्त केलेल्या गुणवंतांचा गुणगौरव तसेच जेष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.सदर, कार्यक्रम माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत असून यावेळी भिवंडी लोकसभा खासदार सुरेश म्हात्रे, माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, शिवसेना उपनेते प्रकाश पाटील, माजी आमदार रुपेश म्हात्रे, समाज कल्याण न्यास अध्यक्ष सोन्या पाटील, टीडीसी बँक संचालक अनंत शिसवे, माजी कृ.उ.बाजार समिती सभापती किसन भांडे, शिवसेना (उबाठा) तालुका सहसंपर्कप्रमुख कमलाकर जाधव, उद्योजक अनिल मानिवडे, कवी सुनील पाटील, टीडीसी बँक माजी मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण गोंधळी, जेष्ठ किर्तनकार ह.भ.प.गोविंद महाराज तरणे आदि पदाधिकारी उपस्थित मान्यवर पदाधिकारी उपस्थित राहणार असून यामध्ये सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे विश्वस्त मंडळ व कार्यकारी मंडळ पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## थोडक्यात

### आजच आपला मालमत्ता कर भरा आणि दंडात्मक कारवाई टाळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कर देयके मालमत्ताधारकांना वितरीत केलेली असून, अद्यापही कराचा भरणा केलेला नाही अशा मालमत्ताधारकांच्या मिळकतींना जप्ती वॉरंट पूर्व सुचना बजाविणेत येत आहेत. तरीदेखिल, विहित मुदतीत कराचा भरणा न केल्यास मालमत्तावर जप्ती/अटकावणीची कारवाई होणार आहे. याचबरोबर, अशा मालमत्तांची नळ जोडणी खंडीत केली जाणार आहे. मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना आवाहन करण्यात येते की, मालमत्ता कराचा भरणा तातडीने विहित मुदतीत करुन महापालिकेस सहकार्य करावे आणि थकीत मालमत्ता कराच्या रक्कमेवर दर महिना २ टक्के दंडात्मक कारवाई, जप्ती/अटकावणी, नळ जोडणी खंडीत करणे अशी अप्रिय कटू कारवाई टाळावी.

### मुसळेपाड्यात स्मशानभूमीचे भूमिपूजन

अशोक वीर यांच्या प्रयत्नाला यश



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** खर्डी विभागातील धामणी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या मुसळे पाडा येथे स्वातंत्र्यच्या 75 वर्षांनंतर धामणीचे माजी सरपंच/सदस्य व जिजाऊ संघटनेचे खर्डी विभाग अध्यक्ष अशोक वीर यांनी सातत्याने जिप कडे पाठपुरावा करून मुसळेपाडा येथे स्मशानभूमी मंजूर करून घेतली.येथे 50,/60 घरे असून 250 च्या आसपास लोकवस्ती आहे.येथे एखाद्याचा मृत्यू झाल्यास त्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी 1/2 किमी चालत जाऊन नदीकाठी किंवा जंगलात जिथे उघडी जागा मिळेल तिथे करण्यात येत होते.या गैरसोयीची दखल घेत अशोक वीर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. या स्मशानभूमीचे भूमिपूजन सरपंच सुगंधा वीर व अशोक वीर यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळीग्रुप ग्रामपंचायत धामणीचे सरपंच सुगंधा वीर,माजी सरपंच तथा सदस्य अशोक वीर, ग्राप सदस्य भारत मांजे, सिमा फोडसे, मनिष राऊत ज्येष्ठ नागरीक भाऊसाहेब गोवर्धने यांच्यासह स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

### कल्याणमध्ये अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार

८ नराधमांचे घृणास्पद कृत्य

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याणमध्ये एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. महात्मा फुले पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्याचं उघडकीस आलं आहे. या प्रकरणात 8 नराधमांनी वेळोवेळी या मुलीवर अत्याचार केले. धक्कादायक बाब म्हणजे, यातील एका आरोपीने, जो तिचाच नातेवाईक आहे, त्याने सोशल मीडियावर 'बॉयफ्रेंड देतो' असं सांगून मित्रांकडून हे घृणास्पद कृत्य घडवून आणलं. हा प्रकार पीडित मुलगी गर्भवती राहिल्या नंतर उघडकीस आला . त्यानंतर तिच्यावर झालेल्या अत्याचाराची धक्कादायक बाब तिच्या कुटुंबीयांना समजली. तात्काळ मुलीच्या वडिलांनी कल्याण महात्मा फुले पोलीस ठाण्यात धाव घेत या नराधमांविरुद्ध सामूहिक बलात्काराचा गुन्हा दाखल केला.पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेत तात्काळ कारवाई केली. त्यांनी 8 पैकी 7 आरोपींना अटक केली असून, एका आरोपीचा शोध सुरू आहे. सर्व आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आलं असून न्यायालयाने गाडी आणि मोबाईल जप्तीसह पुढील तपासासाठी या आरोपींना 30 तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील आरोपींच्या वकिलांनी पीडित मुलीच्या वयाची चौकशी करण्याची मागणी न्यायालयाकडे केली आहे. त्यामुळे या प्रकरणात आता पोलिसांच्या पुढील तपासाकडे आणि न्यायालयाच्या भूमिकेकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी

# राज्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन देणार

अधिकारी महासंघाचा निर्णय

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** राज्यात अतिदृष्टीमुळे उद्भवलेली परिस्थिती अतिशय गंभीर आहे. या बिकट परिस्थितीत राज्यातील जनतेबरोबर शासनाचे सर्व अधिकारी आहेत याची ग्वाही म्हणून सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून राज्यातील दीड लाख राजपत्रित अधिकाऱ्यांच्या माहे सप्टेंबर 2025 च्या वेतनातील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीला देण्याचा अधिकारी महासंघाने निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र राज्यातील बहुतांश भागात ढगफुटीसदृश्य अतिवृष्टीमुळे शेतीचे तसेच नागरिकांचे अपरिमित नुकसान झालेले आहे. या अपादग्रस्त स्थितीमध्ये राज्यातील जनतेला धीर देत शासनप्रमुख अतिशय संयमाने प्रभावी उपाययोजना आखात आहेत. राज्यातील या अस्मानी संकटाला एकजुटीने तोंड देण्यासाठी राज्य शासनाला महाराष्ट्रातील राजपत्रित अधिकाऱ्यांची देखील समर्थ साथ राहील याची अधिकारी महासंघाने दि.23 सप्टेंबर 2025 रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांना पाठवलेल्या पत्राद्वारे ग्वाही दिली आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यातील जनता जेव्हा अडचणी येते अशा बिकट प्रसंगी राज्य शासनातील एक जबाबदार घटक म्हणून अधिकारी महासंघाच्या निर्णयानुसार राज्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांची एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस यापूर्वी अनेकदा दिलेले आहे.

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ हा 70 खातेनिहाय राजपत्रित अधिकारी संघटनांचा शासन मान्यता प्राप्त महासंघ असल्याने अशा वेतन कपातीसाठी व्यक्तिगत संमतीची गरज नाही. विशेष म्हणजे बहुतांश सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी देखील एक दिवसाची निवृत्ती वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा मनोदय महासंघाकडे व्यक्त केला आहे. त्यानुसार राज्यात सर्व कार्यरत आणि सेवानिवृत्त राजपत्रित अधिकाऱ्यांचा माहे सप्टेंबर 2025 च्या वेतनातील एक दिवस दिवसाचे वेतन /निवृत्ती वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस परस्पर जमा करण्यासंबंधीचा शासन आदेश तत्त्वावर निर्गमित करण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्याची विनंती देखील अधिकारी महासंघाने राज्य शासनाला दिलेल्या पत्रामध्ये नमूद केली आहे.असे महासंघाचे अध्यक्ष नितीन काळे, सरचिटणीस समीर भाटकर, कोषाध्यक्ष संतोष ममदापुरे, सिद्धी संकपाळ यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे सांगितले आहे.

# एल डी सी मल्टीस्टेट सोसायटीकडून सभासदांना दिवाळी भेट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता





**नारायणगाव :** एल डी सी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने यावर्षी सभासदांची दिवाळी गोड करत भेटवस्तूंसह १० टक्के लाभांश जाहीर केला आहे, अशी माहिती संस्थापक राजाराम पाटे व अध्यक्ष हरिभाऊ वायकर यांनी दिली.

नीलायम गार्डन, नारायणगाव येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत हा निर्णय घेण्यात आला. या वेळी उपाध्यक्ष सुजाता जाधव, सचिव शामराव जाधव, संचालक प्रकाश लांडगे,सचिन जुंदरे , पंकज वऱ्हाडी , प्रल्हाद पाटे , अरुण दुधाने , संगीता काळे , जिजाभाऊ टेमगिरे , मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष वऱ्हाडी आदींसह अधिकारी , कर्मचारी , सभासद , मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजाराम पाटे म्हणाले की, संस्थेच्या १३ वर्षांच्या प्रवासात सभासदांच्या विश्वासामुळे ठेवी १०० कोटींकडे वाटचाल करत आहेत. नारायणगाव, सावरगाव, चाकण, ओतूर, जुन्नर, राजणी, मंचर, मंगरूळ अशा ठिकाणी शाखा कार्यरत असून आणखी शाखा सुरू करण्याचा मनोदय आहे. अध्यक्ष हरिभाऊ वायकर यांनी सांगितले की, संस्थेचे वसूल भागभांडवल ३ कोटी १५ लाख, स्वनिधी ७९ कोटी ३३ लाख, कर्जवाटप ७४ कोटी असून संस्थेला ५२ लाख ४६ हजार रुपयांचा नफा झाला आहे. त्यातून सभासदांना लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सभेत सर्व विषयांना सभासदांनी उत्साहाने मंजुरी दिली. सभासद सत्यवान थोरात, ॲड. जयराम तांबे, भाऊ गाढवे, डॉ. अनुष्का शिंदे,आनंद ढवळे,जयकुमार पटवा आदींनी चर्चेत सहभाग घेतला. सूत्रसंचालन बबन वऱ्हाडी व शरद खोकराळे यांनी केले, तर स्वागत सुषमा भोर यांनी आणि आभार उपाध्यक्ष सुजाता जाधव यांनी मानले.

# ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




**पेण :** ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ, सानपाडा येथे विधीशाखेतील विद्यार्थ्यांसाठी नियमित शैक्षणिक उपक्रमांबरोबरच प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळावे याकरिता विविध शैक्षणिक दौऱ्यांचे आयोजन केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी 'मुंबई उच्च न्यायालय भेट' हा महत्त्वपूर्ण अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला. या अभ्यासदौऱ्याचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. गोवर्धन देवनानी आणि महाविद्यालयाच्या कायदेशीर साहाय्य विभागांतर्गत त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक प्राध्यापिका ऋतुजा चव्हाण, सहाय्यक प्राध्यापक रेहमान सर आणि देशमुख सर यांनी केले. या दौऱ्यात महाविद्यालयातील तृतीय वर्ष एल.एल.बी. तसेच बी.ए. एल.एल.बी. च्या मिळून एकूण ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या अभ्यास दौऱ्यामध्ये विद्यार्थ्यांना उच्च न्यायालयातील कार्यपद्धती, कायदेशीर सहाय्य विभाग, बार कौन्सिल संघटना, कायदेशीर समुपदेशक विभाग, न्यायालयाची ऐतिहासिक निर्मिती समजून देणारे संग्रहालय, ब्रिटिशकालीन न्यायव्यवस्था, भव्य वाचनालय अशा विविध विभागांची माहिती प्रत्यक्षरित्या मिळाली. या दरम्यान न्यायालयीन व्यवहार, वकीलांचे कामकाज तसेच बार कौन्सिल विभागात विद्यार्थ्यांसाठी खास मार्गदर्शनही करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मते, हा दौरा त्यांच्या भविष्यातील विधी व्यवसायासाठी अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरला आहे. दिवसभरातील या अभ्यासदौऱ्यात विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण सहभाग घेत विचारांची देवाणघेवाण केली.शेवटी विद्यार्थ्यांनी या अभ्यासदौऱ्याचे उत्तम आयोजन केल्याबद्दल महाविद्यालय प्रशासन व महाविद्यालयाच्या कायदेशीर साहाय्य विभागाचे आणि प्राध्यापकवर्गाचे आभार मानले.

# भिवंडी मनपा आयुक्तांकडे दिवाळीसाठी सानुग्रह अनुदानाची मागणी

भारतीय कामगार कर्मचारी महासंघ युनियनने केली मागणी

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिका अधिकारी व कर्मचारी यांना सालाबाद प्रमाणे सन 2025 या सालाकरीता प्रत्येक कर्मचाऱ्यांला 16 हजार 200 रुपये दिवाळी सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मागणी भारतीय कामगार कर्मचारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांच्याकडे लेखी निवेदनपत्राद्वारे केली आहे. भिवंडी महानगर पालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यंदा आयुक्त अनमोल सागर यांनी दिलेल्या निर्देशानुसार चांगल्याप्रकारे मालमत्ता कर वसूली केली तसेच विविध उपक्रम,सण - उत्सव प्रसंगी कामकाज प्रामाणिकपणे करून आपले कर्तव्य बजावत आहेत.

मागील वर्षामध्ये म्हणजे सन 2024 या साला करीता महापालिका आयुक्त प्रशासनाने दिवाळी सानुग्रह अनुदान 14 हजार 200 रुपये मात्र प्रत्येक कर्मचाऱ्याला दिले होते.तसेच प्रत्येक वर्षामध्ये देण्यांत आलेल्या दिवाळी सानुग्रह अनुदानाच्या रक्कमे मध्ये 2 हजार रुपये वाढ करुन देण्यांत आले आहे. त्यानुसार या वर्षी सुध्दा म्हणजे सन 2025 या वर्षाच्या सानुग्रहाच्या रक्कमे मध्ये 2 हजार रुपयाची वाढ करुन भिवंडी महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रत्येकी 16 हजार 200 रूपये दिवाळी सानुग्रह अनुदान देण्यांत यावे, अशी मागणी भारतीय कामगार कर्मचारी महासंघाच्या भिवंडी युनिट युनियनचे अध्यक्ष भानुदास भसाळे व सचिव श्रीपत तांबे यांनी प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे.

## भाडेतत्वावर वाहन पुरविण्याबाबत दरपत्रक सादर करण्याचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** जागतिक बँक सहाय्यित मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्पांतर्गत प्रकल्प अमंलबजावणी कक्ष (स्मार्ट), प्रकल्प संचालक (आत्मा) या कार्यालयाच्या पर्यवेक्षण व निरीक्षण कामाकरिता भाडेतत्वावर वाहन पुरविण्याबाबत इच्छुक एजन्सी वाहनधारक / टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांच्याकडून दरपत्रक मागवावयाचे आहे.

याबाबतची सविस्तर माहिती मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्पाच्या कार्यालयाच्या संकेतस्थळ https://www.smart-mh.org वर उपलब्ध असून अटी व शर्तीच्या अधीन राहून जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसांच्या आत दि.08 ऑक्टोबर 2025 ला दुपारी 12 वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात जिल्हा प्रकल्प अमंलबजावणी कक्ष (स्मार्ट), ठाणे कार्यालय येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रकल्प अमंलबजावणी यंत्रणा, (स्मार्ट) तथा प्रकल्प संचालक (आत्मा) रामेश्वर पाचे यांनी केले आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अँण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# ज्येष्ठ पदाधिकाऱ्याला साडी नेसवल्याप्रकरणी काँग्रेस शिष्टमंडळाने घेतली पोलीस उपायुक्तांची भेट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मॉर्फ केलेला फोटो वायरल केल्या प्रकरणी भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसच्या 72 वर्षीय वृद्ध पदाधिकार्याला साडी नेसवली. या प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटत असून संबंधितांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन पोटे आणि त्यांच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांची भेट घेतली. भाजपा पदाधिकाऱ्यांनी केलेला हा प्रकार अतिशय निंदनीय असून याप्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान यावेळी ते वृद्ध कार्यकर्ते प्रकाश पगारे यांची प्रकृती खालवल्याने त्यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. येत्या दोन दिवसात संबंधित आरोपींवर कारवाई झाली नाही तर डीसीपी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी दिला आहे.

*हा प्रकार अतिशय निंदनीय असून याप्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी*

यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांच्यासह प्रकाश पगारे, काँग्रेस प्रदेश महासचिव नवीन सिंग, महिला जिल्हाध्यक्ष कांचन कुलकर्णी, जिल्हा कार्याध्यक्ष राजाभाऊ पातकर, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष जपजित सिंग, विमल ठक्कर, मुन्ना तिवारी, जयदीप सानप, प्रवीण साळवे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# "थांग-ता" पारंपरिक खेळाच्या स्पर्धेत ठाणे जिल्हा अग्रेसर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** थांग-ता फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने ऑल महाराष्ट्र थांग-ता असोसिएशनच्या माध्यमातून १९ ते २१ सप्टेंबर दरम्यान २९ वी थांग-ता राज्य स्पर्धा अमरावती येथे आयोजित करण्यात आली. थांग-ता हा मणिपूर मधील पारंपारिक मर्दानी खेळ आहे. अमरावती येथील राज्य स्पर्धेसाठी २५ जिल्ह्यातून ४३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ठाणे जिल्ह्यातून कल्याण, डोंबिवली, ठाणे शहर, भिवंडी येथील ३४ खेळाडूंनी सहभागी झाले.

विविध वजनी गटात खेळाडूंनी पदके पटकावली आहेत. यामध्ये सुवर्ण पदक - विभावरी गायकवाड, हितांशी पटेल, भार्गवी कुडव, अन्सारी झुफा रेहमान, अमन ढोकळे, कविश पाटील यांनी पटकावले. रौप्य पदक - अवनी कोलते, ऐश्वर्या सिंग, यागनी मावनी, श्रेया शिंपी, गौरी भोसले, आर्या यादव, कनिष्क गुंजाळ, सार्थक बामणे, समर्थ घुर्घुई, नैतिक राजगुरू, हर्ष तरे, अक्षय राठोड, अन्सारी अझहान रेहमान यांनी पटकावले. तर कान्स्य पदक - प्रणाली शेणे, पलक चौताला, बल्लाळ रुमडे, कार्तिक चव्हाण, अथर्व पवार, संदीप मौर्टा, आरव जाधव, आरुश बास्ते यांनी पटकावले.

या खेळाडूंना ऑल ठाणे डिस्ट्रिक्ट थांग-ता स्पोर्ट्स असोसिएशनचे डॉ. जॉय, सचिव गिरीश वाघमारे, सहकार्यवाह उमेश परब, प्रशिक्षक एस.एन. मोमीन सर, भिवनी या प्रशिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंनी प्राप्त केलेल्या यशाबद्दल ऑल ठाणे डिस्ट्रिक्ट थांग-ता स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी प्रशिक्षक व खेळाडूंचे कौतुक केले.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई | नवी मुंबई | ठाणे | पालघर | रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024